प्रेसनोट दिनांक ०९/०८/२०२१

निबंधक कार्यालय, ठाणे कमांक ८, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील दुय्यम निबंधक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे दैनंदिनी क्र. | :- | कोपरखैरणे पोलीस ठाणे दैनंदिनी क.दि.०९/०८/२१ रोजी ५०/२०:४५ वा |
| लोकसेविकेचे नाव व कार्यालय | :- | श्रीमती दिपाली प्रशांत साळसकर वय ४६ वर्षे (वरिष्ठ लिपीक) प्रभारी दुय्यम निबंधक, निबंधक कार्यालय, ठाणे क. ८ कोपरखैरणे नवी मुंबई |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ८६,६००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.८६,६००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार या प्रॉपटी रजिस्ट्रेशनची कामे करतात. तक्रारदार यांचेकडून पुर्वी केलेल्या २७१ प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनचे कागदपत्रांमध्ये त्रुटी न काढता दस्त नोंदणी पावतीवर स्वाक्षरी केली तसेच दिनांक ०९/०८/२०२१ रोजीच्या २५ प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनचे नोंदणी पावतीवर स्वाक्षरी करण्यासाठी लोकसेवीका श्रीमती दिपाली साळसकर या लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अशी तक्रार, तक्रारदार यांनी दि.०९/०८/२०२१ रोजी दिली होती.<br><br>दि.०९/०८/२०२१ रोजी शासकिय पंचा समक्ष लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे पुर्वीचे २७१ प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनचे कागदपत्रांमध्ये त्रुटी न काढता दस्त नोंदणी पावतीवर स्वाक्षरी केल्याबाबत लोकसेविका श्रीमती दिपाली साळसकर यांनी तक्रारदार यांचेकडून रू.८६,६००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे तसेच दिनांक ०९/०८/२०२१ रोजीच्या २५ प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनचे नोंदणी पावतीवर स्वाक्षरी करण्यासाठी नंतर लाचेची रक्कम घेणार असल्याचे निष्पन्न झाले.<br><br>त्यानंतर काहीवेळाने केलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरखैरणे, नवी मुंबई कार्यालयात लोकसेविका श्रीमती दिपाली साळसकर यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. ८६,६००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना १८:५० वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार
अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप क्र. :- ९९३०९९७७००

पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई नवी मुंबई

(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई